MHSO100001682025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ११.०२.२०२५. |
| नोंदणी तारीख | : | ११.०२.२०२५. |
| निकाल तारीख | : | २०.०४.२०२६. |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०१ ०२ ०९ |

**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात.**

**(पीठासीन अधिकारी–सो.द.घनवट यांचे समोर)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०३/२०२५.**

**निशाणी क्र.२०/अ.**

रंजना गणपत कोळेकर, उ.व.६१, )
धंदा–घरकाम, रा.दत्त चौक, अकलूज, )...**अर्जदार.**
ता.माळशिरस, जि.सोलापूर. )

**विरुध्द**

श्री.तानाजी दगडू घुले, उ.व.४८, )
धंदा–शेती, रा.बागेवाडी, )...**गैरअर्जदार**.
ता.माळशिरस, जि.सोलापूर. )

**अर्ज : मुदतीचा अधिनियमचे कलम–५ प्रमाणे विलंब माफीसाठी.**

---

अर्जदारातर्फे विद्वान वकील – श्रीमती एस.बी.मोदगेकर.
गैरअर्जदारतर्फे विद्वान वकील– श्री.व्ही.पी.वाघमारे.

-----------------------------------

## न्यायनिर्णय

(आज ता.२०, माहे एप्रिल, २०२६ रोजी पारीत केला.)

अर्जदाराने सदरचा अर्ज मुदतीचा अधिनियम, १९६३ चे कलम–५ प्रमाणे नि.दि.दा.क्र.४५४/२०२२ (जूना नि.दि.दा.क्र.६६३/२०१८) हा पुर्ववत करण्यासाठी चौकशी अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे.**

२. अर्जदाराने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, तिने माळशिरस येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर या न्यायालयात नि.दि.दा.क्र.६६३/२०१८ हा खरेदीखत उलटून मिळण्यासाठी, ठराव होऊन मिळण्यासाठी व कायमचे मनाई हुकूमासाठी दाखल केला होता. त्यानंतर तो दावा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस यांच्या न्यायालयात वर्ग होऊन त्याला नवीन नि.दि.दा.क्र.४५४/२०२२ हा देण्यात आला होता. सदरचा दावा ता.१०.०७.२०२४ रोजी चौकशीसाठी म्हणजेच अर्जदाराचे सरतपासाचे शपथपत्र देण्यासाठी नेमण्यात आला होता. त्यादिवशी अर्जदार ही आजारी असल्यामुळे न्यायालयात येऊ शकली नाही. त्यामुळे वादीला दावा चालविण्याची इच्छा दिसत नाही या कारणावरुन ता.१०.०७.२०२४ रोजी सदरचा दावा न्यायालयाने काढून टाकला आहे. त्याबाबत अर्जदाराचे वकीलांना ता.११.०८.२०२४ रोजी माहिती झाली. त्यानंतर अर्जदाराचे वकीलांनी अर्जदारास त्याबाबत माहिती दिली परंतु

अर्जदार ही आजारी, वयस्कर व गरीब असल्यामुळे ती न्यायालयात वकीलाकडे येऊ शकली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करण्यास ०७ महिन्यांचा विलंब झाला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबतचा असल्यामुळे तो पुर्ववत करण्यासाठी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. म्हणून शेवटी तिने दावा पुर्ववत करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. गैरअर्जदार याला सदरचे अर्जाची नोटीस बजावल्यानंतर तो वकीलांमार्फत हजर झाला असून त्याने त्याचे म्हणणे नि.क्र.१४ वर दाखल केले आहे. त्याने अर्जदाराच्या अर्जातील सर्व मजकूर नाकारलेला आहे. त्याने पुढे कथन केले आहे की, वादी व तिचे वकील न्यायालयात हजर राहत नसल्यामुळे न्यायालयाने ता.१०.०७.२०२४ रोजी सदरचा दावा काढून टाकला आहे. अर्जदाराने अर्जात नमुद केलेली कारणे चुकीची असून त्याबाबत योग्य पुरावा न्यायालयात दाखल केला नाही. नि.दि.दा.क्र.४५४/२०२२ यातील नि.क्र.५ चा आदेश ता.२५.१०.२०२३ रोजी गैरअर्जदाराच्या बाजूने लागलेला असून सदरचा दावा वादीच्या पुराव्यासाठी ठेवण्यात आलेला होता. अर्जदाराच्या बाजूने नि.क्र.५ चा आदेश न झाल्यामुळे तिने सदरच्या दाव्यात योग्य ती कार्यवाही केली नव्हती. त्यामुळे ता.१०.०७.२०२४ रोजी सदरचा दावा न्यायालयाने काढून टाकला आहे. सदरचा दावा काढून टाकण्याबाबतचा आदेश हा योग्य आहे. म्हणून शेवटी त्याने अर्जदाराचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदाराचे अर्जातील कथन व गैरअर्जदारचे कथन लक्षात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ आहेत व त्या मुद्दयावर मी खालील दिलेल्या कारणांसह माझे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदाराने विलंब माफीबाबतची कारणे योग्य, पुरेशी व संयुक्तीक दिली आहेत काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

५. अर्ज व त्यातील कथन शाबीत करण्यासाठी अर्जदाराने स्वतःचे (अ.सा.क्र.१) पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१५ वर दाखल केले आहे. याउलट, गैरअर्जदारातर्फे सदरच्या प्रकरणात कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा आणलेला नाही. मी अर्जदाराचे विद्वान वकील श्रीमती मोदगेकर व गैरअर्जदाराचे विद्वान वकील श्री.वाघमारे यांचा युक्तिवाद ऐकला.

## मुद्दा क्र.१ बाबतः–

६. रंजना (अ.सा.क्र.१) हिने तिच्या जबानीत मुळ अर्जातील सर्व मजकूर सांगितला आहे. तिने सांगितले आहे की, नि.दि.दा.क्र.४५४/२०२२ हा ता.१०.०७.२०२४ रोजी चौकशीसाठी म्हणजेच अर्जदाराचे सरतपासाचे शपथपत्र देण्यासाठी नेमण्यात आला होता. त्यादिवशी ती आजारी असल्यामुळे न्यायालयात येऊ शकली नाही. त्यामुळे

वादीला दावा चालविण्याची इच्छा दिसत नाही, या कारणावरुन ता.१०.०७.२०२४ रोजी सदरचा दावा न्यायालयाने काढून टाकला आहे. त्याबाबत तिचे वकीलांना ता.११.०८.२०२४ रोजी माहिती झाली. त्यानंतर तिचे वकीलांनी तिला त्याबाबत माहिती दिली परंतु ती आजारी, वयस्कर व गरीब असल्यामुळे ती न्यायालयात वकीलाकडे येऊ शकली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करण्यास ०७ महिन्यांचा विलंब झाला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबतचा असल्यामुळे तो पुर्ववत करण्यासाठी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. अर्जदाराचा उलटतपास गैरअर्जदारातर्फे घेण्यात आलेला आहे परंतु त्यामध्ये महत्वाचे असे काहीही अभिलेखावर आलेले नाही.

७. सदरचा दावा पुर्ववत करण्यासाठी जो अर्ज दाखल करावा लागतो, तो दाखल करण्यास ०७ महिन्याचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब होण्यामागे अर्जदाराची कोणतीही चूक नाही. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत असून त्यामध्ये अर्जदाराचे हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे सदरचा दावा पुर्ववत करण्यासाठी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे.

८. मी सदरचे प्रकरणातील संबंधीत दस्तऐवज पाहिले. विलंब माफीच्या अर्जाचा विचार करताना पुरेसे कारण या संज्ञेचा विचार करताना उदार दृष्टीकोन ठेवणे आवश्यक असते. तसेच अशा प्रकरणात व्यवहारीक दृष्टीकोन ठेवायचा नसतो. भारतीय मुदतीचा अधिनियम, १९६३ चे कलम–५ नुसार न्यायालयाने पक्षकारांसाठी चांगल्या प्रकारे न्याय करण्यासाठी

तसेच प्रकरण गुणवत्तेवरती ठरविण्यासाठी त्याची तरतुद केली आहे. पुरेसे कारण या मागील खरा अर्थ असा आहे की, न्यायालयाने अर्थपुर्ण पध्दतीचे कायद्याचा वापर करावा की, ज्यामुळे अंतिम न्याय होण्यास मदत होईल. जर अशा प्रकरणात विलंब माफ केला नाही तर चांगले गुणवत्तेचे प्रकरण बाजूला फेकले जावू शकते. जर अर्ज मंजूर केला तर प्रकरणाचा चौकशीनंतर गुणवत्तेवर निकाल देता येतो.

९. सदरचे प्रकरणात मुळ दावा हा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, माळशिरस या न्यायालयातून दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस या न्यायालयात वर्ग झाल्याचे दिसून येते. त्यानंतर सदरचा दावा अर्जदाराच्या पुराव्यासाठी नेमण्यात आल्यावर ती आजारी असल्यामुळे तिला न्यायालयात हजर राहता आले नसल्याचे दिसून येते. गैरअर्जदाराने सदरचे प्रकरणात तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदाराच्या पुराव्यावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. अर्जदाराने दाखवून दिले आहे की, सदरचा दावा काढून टाकल्याबाबतचा आदेश पुर्ववत करण्यास पुरेशा कारणामुळे त्याबाबतचा चौकशी अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ केला नाही तर, अर्जदाराचे अपरिमीत नुकसान होईल. अर्जदाराने मुदतीचा अधिनियमचे कलम–५ प्रमाणे विलंब माफ करण्यासाठी शाबीत केले आहे की, सदरचा विलंब माफ करण्यास पुरेशी व संयुक्तीक कारणे आहेत. त्यामुळे न्यायाचे हितार्थ सदरचा विलंब माफ करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवित आहे.

## मुद्दा क्र.२ बाबतः–

१०. अर्जदाराला दावा पुर्ववत करण्याचा चौकशी अर्ज दाखल करण्यासाठी ०७ महिने विलंब झालेला आहे, त्यामुळे गैरअर्जदाराला त्रास सहन करावा लागलेला आहे. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदाराला खर्चाची एकूण रक्कम रु.२,०००/– देणे न्यायोचित होईल. म्हणून मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज अर्जदाराने गैरअर्जदारास एकूण रक्कम रु.२,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. दावा पुर्ववत करण्यासाठी चौकशी अर्ज दाखल करावयाच्या अर्जाला झालेला विलंब याद्वारे माफ करण्यात येत आहे.

३. अर्जदाराने ता.१७.०२.२०२५ रोजी दावा पुर्ववत करण्यासाठी दिलेला चौकशी अर्ज नोंदणी करण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.20 17:36:13 +0530

दि.२०.०४.२०२६.

(सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माळशिरस.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईल मधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री.म.पां.सदाफुले.

न्यायालयाचे नावःदिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.२०.०४.२०२६.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.२०.०४.२०२६.

न्यायनिर्णय स्वाक्षरित केल्याचा दि.२०.०४.२०२६.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.२०.०४.२०२६.

स्वाक्षरित/–
(म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
माळशिरस.